(सिएनआर.नं.एम.एच.ए.एच२२—०००००२—२०१८)

**फौ.कि.चौ.अर्ज क्र.१/२०१८**

रामदास विठोबा विरुध्द

ग्रामपंचायत, कानगुडवाडी.

**निशाणी क्र.१ कडील आदेश**.

प्रस्तुतचा अर्ज जन्म मृत्यु कायदा १९६९ व जन्म—मृत्यु नियम १९७६ चे कलम १३(३) व नियम १० अन्वये जन्म नोंदणी करुन मिळण्याच्या आदेशासाठी केलेला आहे.

२) अर्ज वाचला. अर्जदारच्या कथनानुसार सामनेवाला क्रं.२ प्रदिप रामदास कानगुडे हा त्याचा मुलगा आहे. सामनेवाला क्रं. २ व पुजा प्रदिप कानगुडे यांचा विवाह झालेला आहे. सामनेवाला क्रं. २ यास त्याचे पत्नीपासुन मुलगा नामे आयुष प्रदिप कानगुडे याचा जन्म दिनांक ०९/०८/२०१६ रोजी अर्जदारच्या राहते घरी मौजे—कानगुडवाडी, ता.कर्जत, जि.अहमदनगर येथे झालेला असून त्याची जन्मनोंदणी केली नसल्याने ती करणेबाबत सामनेवाला क्र. १ यांना आदेशीत करण्यात यावे अशी विनंती केली आहे. सामनेवाला क्र.१ यांनी कार्यालयात नोंद नसल्याची बाब अनुपलब्धता प्रमाणपत्र देवून मान्य केली आहे. अर्जासोबत दाखल केलेली कागदपत्रे पडताळून पाहिली व दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकले.

३) अर्जदारने अर्जाच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.०६ वर ग्रामपंचायत, कानगुडवाडी येथे जन्मनोंद नसल्याचा दाखला दाखल केला आहे. तसेच अर्जदारने अर्जाच्या पुष्ट्यर्थ स्वत:चे शपथपत्र निशाणी क्र.०७ कडे व सामनेवाला क्र.२ प्रदिप रामदास कानगुडे याचे शपथपत्र निशाणी क्र.१० कडे तसेच साक्षीदार पुजा प्रदिप कानगुडे हिचे शपथपत्र निशाणी ०९ कडे दाखल केले आहे. ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कानगुडवाडी, ता.कर्जत यांचे प्रमाणपत्र पाहता, अर्जदारचा यांच्या मुलाचा मुलगा आयुष प्रदिप कानगुडे याची जन्मनोंदणी रजिस्टरला नोंद नसल्याचे दिसून येते. अर्जदार याचे शपथपत्र पहाता आयुष प्रदिप कानगुडे याचा जन्म दिनांक ०९/०८/२०१६ रोजी झाल्याचे स्पष्टपणे सिध्द होते. तथापी त्याच्या जन्माची नोंद झालेली नाही. अर्जातील कारण पहाता

त्यास शैक्षणिक गरजेसाठी प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन अर्जदार यांनी नमूद केलेली जन्म तारीख बरोबर असल्याचे दिसून येते. सबब मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. जन्म—मृत्यू नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत, कानगुडवाडी, ता.कर्जत यांना, अर्जदारच्या मुलाचा मुलगा नामे आयुष प्रदिप कानगुडे याच्या जन्म तारखेची नोंद दिनांक ०९/०८/२०१६ अशी जन्म नोंदणी रजिष्टरला, नियमानुसार असलेल्या शुल्काने व विलंब शुल्काने करुन घेण्याबाबत निर्देशित करण्यात येत आहे.

सही/—

दिनांक— ०२.०४.२०१८ ( ध.ज. पाटील )

कर्जत. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कर्जत.